# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.०८/०६/२०२२

**प्रेसनोट**

राज्य शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव कमी झाल्यामुळे लॉकडाऊन शिथिल करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातही कोरोना संसर्ग झालेल्या रुग्णांची संख्या कमी झाल्यामुळे कोरोना संबंधीचे निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत.

तरीही सद्यस्थितीत माहे जून २०२२ च्या सुरुवातीपासून महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूच्या (कोविड-१९) संसर्गामुळे रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याने दिसून येत असल्याने कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक आहे. कोरोना विषाणूचा संसर्ग झालेल्या रुग्णांना वैद्यकीय सेवा देणेसाठी महानगरपालिका वैद्यकीय विभाग सज्ज असून रुग्णांना योग्य ते उपचार दिले जात आहेत.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे कि, सर्व पात्र नागरिकांनी स्वत:चे व कुटुंबियांचे कोव्हीड-१९ प्रतिबंधक लसीकरण लवकरात लवकर करून घ्यावे. तसेच सार्वजनिक ठिकाणी सर्वांनी मास्कचा वापर करावा, वारंवार हात स्वच्छ धुवावेत, तसेच कोणालाही सर्दी, खोकला, ताप इ. लक्षणे असल्यास तात्काळ वैद्यकीय तपासणी करून योग्य ते उपचार घ्यावेत.

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका